महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
ठाकरसी हाऊस,३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
जे. एन.हेरेडिया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्र.२२६२२०२९/२०३६/६२९१ E-mail- aao.prashakosha-mh@gov.in

संदर्भ- १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही 2015/ प्र. क्र. 303/ का.12, दि.12.09.2016.
२. म.शा.सा.प्र.वि.शा नि क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07.05.2021

*************

क्र. संलेको/प्रशा कोषा/2022/स.अ/कार्या.3./ल.ले.पदोन्नती-2022/106 दि. 01 FEB 2022

**विषय : निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती**

**प्रस्तावना :**

कोकण महसूल विभागातील संचालनालय लेखा व कोषागारे,मुंबई, संचालनालय,स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकणविभाग, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग, सहसंचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण विभाग व राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई या कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक या पदांवर पदोन्नती देण्याची कार्यवाही संदर्भ क्र.१ नुसार संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत केली जाते. यास्तव या संवर्गातील कर्मचाऱ्यांची सामायिक जेष्ठता सूची संचालनालय लेखा व कोषागारे,मुंबई या कार्यालयाच्या स्तरावर तयार केली जाते.

**//आदेश//**

वर प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार कोकण महसूल विभागातील लघुटंकलेखक या संवर्गातील [वेतन स्तर S-8 रु.25,500-81,100/-] खालील कर्मचा-यांना निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गातील पदावर [वेतन स्तर S-14 रु.38,600-1,22,800/-] या वेतन श्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव, व कार्यालय | पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेले कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ४ |
| १. | श्री. महेश द.गंडाळे संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई | सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण विभाग, नवी मुंबई |

कृ.मा.प

**अटी व शर्ती-**

उपरोक्त लघुटंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांस पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून लघुलेखक (निम्नश्रेणी) पदावर तात्पुरती स्थानापन्न पदोन्नती देण्यात येत आहे.

१. श्री.म.द.गंडाळे,लघुटंकलेखक यांना मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन उपरोक्त विवरणपत्रातील कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

२. श्री.म.द.गंडाळे,लघुटंकलेखक त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत हजर व्हावे. विहित कालावधीत हजर न झाल्यास त्यांना ही पदोन्नती स्वीकारण्यामध्ये स्वारस्य नाही असे समजून त्यांच्या पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील.

३. श्री.म.द.गंडाळे,लघुटंकलेखक यांनी पदोन्नती नाकारल्यास संदर्भ क्र. २ वरील दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच यापुढे ते आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र झाले तर त्यांनी नाकारलेली ही पदोन्नती विचारात घेऊन आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाबाबत निर्णय घेण्यात येईल.

४. श्री.म.द.गंडाळे यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरीता तात्पुरती स्थानिक व्यवस्था करुन त्वरित कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व त्यांनी पदोन्नतीच्या पदावर हजर झाल्याचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

५. म.शा.वि.वि.दि.१९.१२.१९९५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, संबंधित कर्मचाऱ्याने वेतननिश्चिती संबंधीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देणे आवश्यक आहे व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास वेतननिश्चिती म.ना.से (वेतन) नियम,१९८१ मधील नियम ११(१)(एक) खाली केली जाईल.

६. सदर पदोन्नती आदेशाची प्रत संचालनालयाच्या www.mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, तरी उपरोक्त पदोन्नत कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करणेबाबत अथवा हजर करुन घेण्याच्या अनुषंगाने संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

**(वैभव राजेघाटगे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत-

१. मा. वित्त मंत्री, यांचे कार्यालय मंत्रालय, मुंबई यांना पुढील कार्यवाहीस्तव.

२/- श्री.म.द.गंडाळे यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होणेकरिता त्वरीत कार्यमुक्त करावे.

२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

३. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण विभाग, नवी मुंबई.

४. लेखा अधिकारी (र व का), मुख्यालय, मुंबई. (दोन प्रती)

५. वैयक्तिक नस्ती.

६. श्री.महेश द गंडाळे, लघुटंकलेखक

७. निवड नस्ती (प्रशा कोषा)